कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 95 /२०२५ दि. 0९/०५/२०२५

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, कापुरबावडी वाहतुक उपविभागचे हद्दीत म. झाड इंन्टरप्रायझेस प्रा.लि. यांचे वतीने दिनांक १०/०५/२०२५ रोजी ते दिनांक १२/०५/२०२५ रोजी पावेतो माजिवाडा जंक्शन येथील रिक्षा स्टॉप ते गोल्डन नाका पावेतो सुमारे २.५ मीटर रुंद व २.५ मीटर खोल असे खोदकाम करुन जलवाहीनी टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे नाशिक कडुन येणारा स्लीप रोड वाहतूकी करीता पुर्णपणे बंद ठेवावा लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) नाशिक मुंबई वाहीनीवरुन स्लीप रोडने मुंबई, ठाणे तसेच घोडबंदर रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मुंबई नाशिक वाहीनीवरील माजिवाडा ब्रीज चढणी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – अ) सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही नाशिक मुंबई वाहीनी माजीवाडा उडड्राण पुलावरुन पुढे सरळ जावुन कॅडबरी जंक्शन (नाका) मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना हि दिनांक १०/०५/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. पासुन ते दिनांक ११/०५/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वा. पावेतो तसेच दिनांक ११/०५/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. पासुन ते दिनांक १२/०५/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.

Scanned with OKEN Scanner